**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 31.05.2025** **वार- शनिवार**

---

अहिल्या

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंती निमित्त पुण्यात सारसबाग इथल्या त्यांच्या पुतळ्याला राष्ट्रीय मजदूर काँग्रेस पुणे शहर आणि जिल्हा इंटकचे अध्यक्ष चेतन आगरवाल यांच्या हस्ते आज पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्याप्रसंगी सरचिटणीस मनोहर गाडेकर, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पुणे शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीनं देखील अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकावर पुष्पहार अर्पण करून अभिवादन सभा आयोजित करण्यात आली. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, राज्यसभा खासदार डॉक्टर मेधा कुलकर्णी, आमदार हेमंत रासने, सरचिटणीस रवींद्र साळेगावकर यांच्यासह नगरसेवक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात  पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात प्र-कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर पराग काळकर यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. याप्रसंगी शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचे प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डीएपी

राज्यासाठी साडेपाच लाख मेट्रिक टन डाय-अमोनियम फॉस्फेट म्हणजे  डीएपीची मागणी असताना केवळ 94 हजार मेट्रिक टन खत साठा शिल्लक होता. म्हणजे मागणीच्या तुलनेत केवळ 17 टक्केच उपलब्धता आहे. परिणामी अनेक जिल्ह्यांमध्ये तुटवडा आहे.  त्यामुळं शेतकऱ्यांनी डीएपीला बाजारात पर्यायी असलेली खतं वापरावीत असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे. डीएपीऐवजी युरिया अर्धी गोणी आणि एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डीएपीला चांगला पर्याय आहे. एसएसपीसोबत संयुक्त खतांचाही वापर करावा असं आवाहन पुणे कृषी संचालक  सुनील बोरकर यांनी केलं आहे.

रोग

पुणे जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळं अनेक गावांमध्ये पाणी साचून डेंगी, मलेरिया, चिकुनगुनिया, कावीळ, विषमज्वर  यांसारख्या

साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेकडून सर्व तालुक्यांमधील आरोग्य यंत्रणांनी तातडीनं प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे आदेश दिले आहेत. सर्व गटविकास अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना त्यांच्या भागात धूर फवारणी आणि भुकटी पसरण्यास सांगितलं आहे, अशी माहिती पुणे  जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली.

तंबाखू

जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त आज पिंपरी-चिंचवड शहरात ठिकठिकाणी जनजागृतीपर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. युवासेना पुणे शाखेच्या वतीनं आयोजित कार्यक्रमात तंबाखू, गुटका आणि इतर अमली पदार्थांचं प्रतीकात्मक दहन करण्यात आलं. यामध्ये मोठ्या संख्येनं युवक सहभागी झाले होते.भारतीय दंतवैद्यक संघटनेच्या हडपसर शाखेतर्फे जनजागृती फेरी काढण्यात आली आणि विविध घोषणांच्या माध्यमातून तंबाखू आणि अन्य अमली पदार्थांच्या व्यसनांपासून दूर राहण्याचं आवाहन करण्यात आलं.

भोसले

पुणे महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांना सेवानिवृत्तीनिमित्त निरोप देण्यात आला. अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी., ओमप्रकाश दिवटे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, आणि त्यांचे

कुटुंबिय यावेळी उपस्थित होते. डॉक्टर राजेद्र भोसले यांनी राज्यात विविध 25 ठिकाणी 32 वर्ष काम केलं. पुणे महापालिका आयुक्त म्हणुन ते गेली सव्वा वर्ष कार्यरत होते.

बदली

पुणे महापालिकेत प्रति नियुक्तीवर आलेल्या आणि उपायुक्त पदावर काम करणाऱ्या प्रतिभा पाटील आणि आशा राऊत यांची बदली करण्यात आली आहे. तर काही अधिकारी प्रति नियुक्तीवर घेण्यात आले आहेत.

मंदिर

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीनं यंदा गणेशोत्सवानिमित्त केरळमधील श्री पद्मनाभ स्वामी मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. केरळची राजधानी तिरुअनंतपुरम इथं भगवान विष्णूंना समर्पित पद्मनाभस्वामी मंदिर आहे.

लिग

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी आज महाराष्ट्र क्रिकेट प्रीमियर लीग आणि प्रथमच होणाऱ्या महाराष्ट्र महिला क्रिकेट प्रीमियर लीगची घोषणा केली. या स्पर्धा 4 जून रोजी सुरू

होणार आहेत. महिला गटाचा अंतिम सामना  14 जून आणि  पुरुष गटाचा अंतिम सामना 22 जूनला होणार आहे.
तळागाळातील खेळाडूंना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रत्येक जिल्हा संघटनेला  75 लाख रुपयांचा निधी दिला जाणार आहे. तसंच क्रिकेट खेळाचा विकास करण्यासाठी राज्यभरात 21 अकादमी स्थापन करण्यात येणार आहेत अशी माहिती पवार यांनी दिली.

बालसाहित्य
आसपास सांस्कृतिक ऱ्हासाच्या घडामोडी घडत असताना केवळ शब्दांचे फुलोरे फुलवणारं लेखन पुरेसं ठरणारं नसून बालवयातच संवेदनशील मनं घडतील, असं बालसाहित्य आवश्यक आहे, असं मत ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ आणि बालसाहित्यिक डॉक्टर न. म. जोशी यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे गेल्या वर्षीच्या बाल वाङ्मय पुरस्कारांचं वितरण करताना ते बोलत होते. यावेळी विविध वर्गवारीत बालसाहित्यिकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**